# राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी विभाग, पुणे.

डॉ. अशोक मो. मेहता
एम.बी.बी.एस.,डी.पी.एच.
उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६०५८७४७ (वै.)
०२०-२६०५५५३० (का.)
फॅक्स क्रमांक : ०२०-२६०५८२९२
तार : जन्ममृत्यु
इ-मेल : sbhivs@pn3.vsnl.net.in
डॉ.नायडू रुग्णालय आवार, केनेडी रोड,पुणे-१


जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८ ३/Standardization of B&D Certi/९६३१-७३२/०६ दिनांक २५ सप्टेंबर ०६

प्रति,
मा. आयुक्त,
महानगरपालिका,.....................(सर्व)

मा. जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, .............(सर्व)
(लक्षवेध :- प्रकल्प संचालक, नगरपालिका प्रशासन)

विषय :- Standardization of Births & Deaths Certificates

संदर्भ :- १) मा. उपमहानिबंधक, जन्म-मृत्यु, गृह मंत्रालय, केंद्र शासन नवी दिल्ली यांचेकडील इंग्रजी पत्र No. 6/3/2003-VS(CRS) dated 17.7.2006
२) मा. मुख्य निबंधक, जन्म व मृत्यु तथा संचालक आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र No. DHS/Birth & Death/Standardized Certi. /D18/05, dated 24th July 2006

उपरोक्त विषयी, संदर्भ क्र. १ चे पत्राची छायाप्रत व जन्म व मृत्यु प्रमाणपत्राचा नमुना सोबत जोडण्यात आलेला आहे.

आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी/नगरपालिकेचे मुख्याधिकारी हे नागरी विभागाचे, जन्म व मृत्यू, निबंधक आहेत, यास्तव आपल्या महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी/नगरपालिकेचे मुख्याधिकारी, यांना दि. १ जानेवारी २००७ पासून, सुधारीत नमुन्यात प्रमाणित जन्म व मृत्यु प्रमाणपत्र छापून घेऊन, संबंधित नागरीकांना, बाळाचे जन्म प्रमाणपत्र देण्याविषयी सूचना द्यावी, ही विनंती.

सुधारीत जन्म व मृत्यु प्रमाणपत्राबाबत काही ठळक मार्गदर्शक सूचना (संदर्भ क्र. १ नुसार) खाली नमूद केलेल्या आहेत.

१) जन्म-मृत्यु प्रमाणपत्र हे राज्य शासनाची मराठी भाषा, तसेच इंग्रजी भाषा सह द्विभाषीकेत छापून घ्यावी.

२) जन्म प्रमाणपत्रात अतिरिक्त रकाना खालील प्रमाणे समाविष्ट करण्यात आलेला आहे, " बाळाच्या जन्माच्या वेळी, पालकाच्या पत्याबरोबरच, पालकाचा कायम राहण्याचा पत्ता"

२/- वर नमूद केलेल्या सूचनेनुसार, योग्य ती कार्यवाही आपल्या कार्यक्षेत्रात करावी.

३) मृत्यु प्रमाणपत्रात अतिरिक्त रकाना खालील प्रमाणे समाविष्ट करण्यात आलेला आहे.
"मृत्यू समयी मयत व्यक्तीच्या पत्याबरोबरच मयत व्यक्तीचा कायमचा पत्ता"

४) जन्म-मृत्यु प्रमाणपत्र हा A4 आकाराचा असणे आवश्यक आहे.

५) Standardized जन्म-मृत्यु प्रमाणपत्राच्या करिता वापरावयाचा कागद हा 70GSM चा असावा.

६) Standardized जन्म-मृत्यु प्रमाणपत्रात मुलाच्या/मृतकाच्या आईचे नाव समाविष्ट करावे.

७) शहरी भागातील निबंधक जन्म व मृत्यु यांचेकडील पूर्वीचा (जुना) जन्म-मृत्यु प्रमाणपत्राचा साठा हा ३१ डिसेंबर, २००६ नंतर वापरण्यात येऊ नये.

८) १ जानेवारी, २००७ पासून नविन छापून (सोबतच्या नमुन्यानुसार) घेतलेल्या नमुन्यातच, जन्म-मृत्यु प्रमाणपत्र, शहरी भागातील निबंधक जन्म व मृत्यु यांचेकडून वितरीत होत असलेबाबत कृपया खातरजमा करावी.

९) सदर नमुन्यातील छापील प्रत (Sample Copy) (प्रमाणपत्राची), या कार्यालयास ३१ जानेवारी २००७ पूर्वी पाठविणेस्तव संबंधित निबंधक, जन्म व मृत्यु, यांना सूचना देण्यात यावी ही विनंती.

उपसंचालक आरोग्य सेवा
(आमाजीआ)
तथा उपमुख्य निबंधक, जन्म व मृत्यु,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

त सविनय सादर :- १) मा. संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) मा. उपमहानिबंधक, जन्म-मृत्यु, भारत सरकार, व्ही एस डिव्हीजन पश्चिम विभाग -१ आर के पुरम, नवी दिल्ली ११००६६
३) संचालक, जनगणना, एक्सचेंज बिल्डिंग २ रा मजला, सर शिवसागर रामगुलाम मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई १

:- जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, .......(सर्व) उचित कार्यवाही व पाठपुरावास्तव

:- कार्यकारी अधिकारी कॅन्टोन्मेंट बोर्ड,................/प्रशासक, ऑर्डनन्स फॅक्टरी,...........
२/- वर नमूद केलेल्या सूचनेनुसार, योग्य ती कार्यवाही आपल्या कार्यक्षेत्रात करावी.